महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/परिस स्पर्श/२०२३/ ५६०४

दिनांक : 01 DEC 2023

परिपत्रक:

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
सोलापूर जिल्हा.

**विषय : उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने नॅक (NAAC) तसेच एनबीए (NBA) मुल्यांकन न झालेल्या व्यावसायिक अभ्याक्रमाच्या संस्थांचे नॅक (NAAC) तसेच एनबीए (NBA) मुल्यांकन करुन घेण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळण्यासाठी परिस स्पर्श योजने अंतर्गत उपक्रम राबविणे व इतर विषयांवर चर्चा करण्यासाठी मिटींगला उपस्थित राहणेबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरुन, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PARAMARSH योजनेच्या धर्तीवर राज्यातील **एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन** न झालेल्या महाविद्यालयांचे **एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन** होण्याच्या दृष्टीने परीस-स्पर्श योजना सुरु करण्यास संदर्भाधीन दिनांक १९.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत नॅक/एनबीए मुल्यांकन आणि प्रमाणिकरण असलेले व अनुकरणीय रेकॉर्ड असलेले महाविद्यालय हे मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून नियुक्त केले जातील. त्यांच्या मार्गदर्शनाद्वारे प्रतीवर्षी ५ ते ७ नॅक/एनबीए मुल्यांकन न झालेल्या (मेंटी) संस्था याप्रमाणे योजना कालावधीत (तीन वर्षात) प्रत्येकी १५-२० संस्थांचे नॅक/एनबीए मुल्यांकन करणे अपेक्षित आहे. त्यानुसार या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील संस्थांचे मेंटार व मेंटी संस्था म्हणून मॅपींग करण्यात आले असून त्यांची यादी लवकरच प्रसिध्द करण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अधिकार क्षेत्रातील सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांचे प्राचार्य/संचालक यांचेबरोबर विभागीय स्तरीय समिती सदस्यांना संवाद साधण्यासाठी दिनांक ०६.१२.२०२३ रोजी मिटींग आयोजित करण्यात येत आहे.

**मिटींगचे स्थळ : श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्टचे, सिध्देश्वर वुमन्स पॉलिटेक्नीक, सोलापूर**
**वेळ : सकाळी ११.०० ते ०१.०० - पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.**
**दुपारी ०२.०० ते ०४.०० - पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्था.**
**मिटींगचे विषय : १. परीसस्पर्श योजना प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त संस्थांचे नॅक/एनबीए मानांकन व प्रमाणिकरण करुन घेणे.**
**२. पदविका, पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ करणे.**
**३. महाडीबीटी संकेतस्थळावरील संचालनालयाच्या अखत्यारीतील शिष्यवृत्ती/निर्वाह भत्ता योजना.**

सोलापूर जिल्ह्यातील सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविण्या-या संस्थांचे प्राचार्य सदर मिटींगला उपस्थित रहावे. सोबत विभागीय स्तरीय समितीचे कार्यालयीन आदेश जोडले आहेत.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत:
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यासन क्र. १७) यांना माहितीस्तव.
२) सर्व विभागीय स्तरीय समिती सदस्य. **(ई-मेलद्वारे)**
३) प्राचार्य, श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्टचे, सिध्देश्वर वुमन्स पॉलिटेक्नीक, सोलापूर यांना सदर मिटींगचे नियोजन करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/परिस स्पर्श/२०२३/ 5564 दिनांक : २८.११.२०२३.

29 NOV 2023

**कार्यालयीन आदेश**

**विषय : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदविका संस्थांचे एनबीए (NBA) तसेच नॅक (NAAC) मुल्यांकन करुन घेण्याबाबतच्या परिस स्पर्श योजनेच्या अंमलबजावणीसाठी विभागीय स्तरीय समिती गठीत करणेबाबत...**

संदर्भः १) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२७९/विशि-३ दिनांक १९ एप्रिल, २०२३.
२) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२७९/विशि-३ दिनांक २ जून, २०२३.
३) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, यांचे पत्र क्र. १७/तंशिसं/परीसस्पर्श/२०२३/१७१ दिनांक ०४.०७.२०२३.
४) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२७९/विशि-३ दिनांक १६ नोव्हेंबर, २०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PARAMARSH योजनेच्या धर्तीवर राज्यातील **एनबीए** (NBA) **तसेच नॅक** (NAAC) **मुल्यांकन** न झालेल्या महाविद्यालयांचे **एनबीए** (NBA) **तसेच नॅक** (NAAC) **मुल्यांकन** होण्याच्या दृष्टीने परीस-स्पर्श योजना सुरु करण्यास संदर्भाधीन दिनांक १९.०४.२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली असून, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी संदर्भाधीन दिनांक ०२.०६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्य स्तरीय समिती गठीत करुन विद्यापीठ स्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समित्यांची रचना विहित करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या PARAMARSH योजनेच्या धर्तीवर राज्यातील **एनबीए** (NBA) **तसेच नॅक** (NAAC) **मुल्यांकन** न झालेल्या महाविद्यालयांचे **एनबीए** (NBA) **तसेच नॅक** (NAAC) **मुल्यांकन** होण्याच्या दृष्टीने परीस-स्पर्श योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय १६.११.२०२३ अन्वये **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर** यांच्या अधिकार क्षेत्रातील या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

**विभागीय स्तरीय समितीः**

| अ.क्र. | समितीतील सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. द. व्यं. जाधव, सहसंचालक,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे. | अध्यक्ष |
| २ | डॉ. बी. पी. रोंघे, प्राचार्य,<br>एस.व्ही.ई.आर.आय.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर, जि. सोलापूर | सदस्य |
| ३ | डॉ. विजय आठवले, प्राचार्य,<br>वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | सदस्य |
| ४ | डॉ. एस. आर. गेंगजे,<br>वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | सदस्य |

| अ.क्र. | समितीतील सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| ५ | डॉ. पी. एम. पवार,<br>एस.व्ही.ई.आर.आय.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर, जि. सोलापूर | सदस्य |
| ६ | डॉ. ए. ओ. मुलानी,<br>एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सोलापूर | सदस्य |

शासन निर्णय दिनांक ०२.०६.२०२३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अन्य तरतूदी उपरोक्त समितीसाठी लागू राहतील.

**(डॉ. द. व्यं. जाधव)**
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रतः सर्व समिती सदस्य / निमंत्रित सदस्य. **(ई-मेलद्वारे)**